जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 22-01-2020

तरुण भारत

# डॉ. वैशंपायन कुटुंबीयांचे कुलगुरु डॉ. शिंदेंकडून सांत्वन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. भारती वैशंपायन यांच्या निधनामुळे विद्यापीठ परिवारावर दुःखाचा मोठा आघात झाला आहे. भारतीय संगीत क्षेत्राचीही अपरिमित हानी झाली आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात विद्यापीठ परिवार सहभागी आहे, असे भावनिक उद्गार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. डॉ. वैशंपायन यांच्या कुटुंबीयांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांत्वन केले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

# स्वयंअध्ययन अहवाल महिनाअखेरीस होणार सादर

## शिवाजी विद्यापीठाकडून राष्ट्रीय अधिस्वीकृती, मानांकन परिषद मूल्यमापनाची तयारी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय अधिस्वीकृती व मानांकन परिषदेच्या मूल्यमापनाची तयारी सुरू केलेली आहे. विद्यापीठाकडून स्वयंअध्ययन अहवाल तयार करण्यात येत असून ३१ जानेवारीपर्यंत हा अहवाल नॅककडे पाठवण्यात येणार आहे. त्यानंतर फेब्रुवारीच्या अखेरीस अथवा मार्चच्या प्रारंभी विद्यापीठाची नॅकच्या चमूकडून पाहणी होण्याची शक्यता आहे.



शिवाजी विद्यापीठाला जानेवारी २०२० पर्यंत नॅकचा अ श्रेणी दर्जा मिळाला आहे. त्यापूर्वी नव्या मूल्यमापनाकरिता नॅकला प्रस्ताव पाठवणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यापीठाला आधी स्वयंअध्ययन अहवाल तयार करणे आवश्यक आहे. तत्कालीन कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांच्या कार्यकाळात नॅक मूल्यांकन झाले होते. तेव्हा विद्यापीठाला 'अ' श्रेणी दर्जा मिळाला होता.

यावेळीही विद्यापीठाला चांगली श्रेणी मिळावी यासाठी जोरदार तयारी सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून स्वयंअध्ययन अहवाल अर्थात एसएसआर अहवाल तयार करण्यात येत आहे. हा अहवाल एकूण सात मुद्द्यांवर तयार करण्यात येतो. यामध्ये आपल्याकडे कोणकोणत्या गोष्टी आहेत, सुविधा तसेच विविध क्षेत्रामध्ये आपले विद्यापीठ कोणत्या पातळीवर आहे, याची माहिती स्वयंअध्ययन अहवालामध्ये देण्यात येते. पहिल्या टप्प्यात विद्यापीठाची माहिती सात निकषांनुसार देण्यात येते. त्यानुसार हा अहवाल तयार करण्यात येत आहे. या अहवालामध्ये कोणत्याही त्रुटी राहू नयेत तसेच त्यांच्यावर नॅककडून कोणतीही शंका उपस्थित करण्यात येऊ नये, यादृष्टीने हा अहवाल तयार करण्यात येत आहे.

### सोयी-सुविधांची निर्मिती

जानेवारीअखेर विद्यापीठाचा स्वयंअध्ययन अहवाल नॅककडे पाठवण्यात येईल, तर त्यामधील शंकांच्या पूर्ततेनंतर साधारणपणे फेब्रुवारीच्या अखेरीस अथवा मार्चच्या पहिल्या आठवड्यामध्ये नॅक समिती विद्यापीठाला भेट देण्याची शक्यता आहे. त्यामुळे नॅक समिती येण्यापूर्वी काही बांधकामे पूर्ण करण्यात येत आहेत. त्यासोबतच कॅम्पस परिसरातील रस्ते आणि इमारतींची रंगरंगोटी करण्यात येत आहे.

# भारतीताईंची अशी भैरवी नको होती!

**भारतीताई वैशंपायन हे केवळ एका नामवंत गायिकेचं नाव नव्हतं, तर अनेकांसाठी ते जिव्हाळ्याचं आपलं असं खास ठिकाण होतं. ऋजू व्यक्तिमत्त्वाच्या भारतीताई गायला बसल्या, की शांत, संयमित गायनाने आसमंत भारून टाकायच्या. त्यांनी अधिकाधिक गात राहावं असं वाटे. त्यांची भैरवी सुरू व्हायला नको, असंच वाटायचं. तरीही त्यांनी मैफलीत सादर केलेली भैरवी मग कान आणि मन तृप्त करून जायची. मात्र, आयुष्याच्याच मैफलीचा इतक्या लवकर शेवट करणारी अशी भैरवी रसिकांना नको होती. खरंच नको होती!**

**– सुधांशू नाईक**

सुधाकरबुवा डिग्रजकर, चिंतुबुवा म्हैसकर, निवृत्तीबुवा सरनाईक, बाबूराव जोशी आदी गुरूंकडून मिळालेली संगीतविद्या भारतीताईंनी त्यात आपले प्राण घालून अधिक फुलवली. मंचावरचा सहज वावर, साथीदार कलाकारांशी प्रेमाने वागणं यांमुळे त्यांच्याविषयी देशभरातील रसिकांच्या मनात नेहमीच आपुलकीची भावना निर्माण होई. मैफल सादर करताना नंद, यमन, पूरिया, अहिर भैरव आदी प्रचलित रागांबरोबरच भारतीताई जयपूर-अत्रोली घराण्याची खासियत असलेले बिहागडा, ललितागौरी, खट तोडी, बसंती केदार आदी अनवट रागही सुरेख पेश करायच्या. उत्तम सूर, लयीच्या अंगाने जाणारी बढत, बोल आलाप- बोल ताना, गमकेच्या ताना आदी वैशिष्ट्ये सहज मांडताना त्यांची ती आकाराला महत्त्व देणारी गायकी रसिकांना आपलंसं करायची.

ताईंची आठवण सदैव सर्वांना येत राहील ती मुख्यतः शिवाजी विद्यापीठातील त्यांनी केलेल्या अफाट कामामुळे. संगीत आणि नाट्यशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून भारतीताई रुजू झाल्या आणि एक वेगळंच संक्रमण झालं तिथे. शेकडो विद्यार्थ्यांना ताईंची माया लाभली. अनेकांनी आपलं



संगीतातील बी.ए., एम.ए., पीएचडी सहज पूर्ण केली. त्यासाठी त्यांच्या कष्टासोबत भारतीताईंचं प्रेमळ आणि मोलाचं मार्गदर्शन लाभलं.

शास्त्रीय संगीतच नव्हे तर तबला, व्हायोलिन, सतार आदी वाद्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही भारतीताई आपुलकीने वागवायच्या. आपल्या विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम कलाकार ऐकायला मिळावेत, ही तळमळ उराशी बाळगून देशभरातील दिग्गज गायक-वादक कलावंतांना कोल्हापुरात आमंत्रित केले. शाहू संगीत रजनी, घराणा संमेलन आदी संगीत महोत्सवांचे मोठ्या थाटात आयोजन केले. प्रत्येक गायक-वादक आणि त्यांचे साथीदार यांचा सन्मान राखला जाईल, याची काटेकोर दक्षता घेतली.

संगीत नाटक ही महाराष्ट्राची एक अलौकिक परंपरा. या परंपरेचे जतन व्हावे म्हणून त्यांनी विद्यापीठाच्या संगीत-नाट्य- ललितकला विभागाच्या माध्यमातून अनेक गोष्टी केल्या. विविध संगीत नाटकांचे आयोजन केले. त्यांनी आयोजित केलेल्या 'संगीत स्वयंवर' नाटकानं दिल्लीत जाऊन सर्वोत्तम नाटकाचे पारितोषिक पटकावले. कुणाचेही खोटं कौतुक न करता योग्य तेच मार्गदर्शन करायच्या. त्यांच्या विद्यार्थिनींपैकी अनेकींसाठी संसार सांभाळून कलेचा ध्यास कसा घ्यावा, याचा त्या उत्तम आदर्श होत्या. स्वतःचा संसार सुरेख फुलवताना त्यांनी आपल्या मुलांनाही संगीताचं उत्तम शिक्षण दिलं.

आज त्यांची मुलं, त्यांचे विद्यार्थी मोठ्या आत्मविश्वासाने मैफली रंगवू लागलेत. मैफलीत उत्तम काही सादर केल्यावर नेहमी मिळणाऱ्या त्यांच्या त्या शाबासकीची मात्र आता आठवण येत राहील. दोन-अडीच महिन्यांपूर्वी अचानक त्या आजारी पडल्या तेव्हा असं काही अकल्पित घडेल असं वाटलं नव्हतं. नेहमी गाणारा त्यांचा सुरेल गळा एकदम मूक होऊन गेला आणि आता तर कायमचा दुरावलाच. मात्र, त्यांचं गाणं, ते सच्चे सूर, त्यातलं मार्दव सदैव रसिकांना आठवत राहील, रेकॉर्डिंग्जमधून सुखावत राहील, यात शंकाच नाही. भारतीताईंना श्रद्धांजली.

# प्रेरणा, योग्य संधीतून विकास साधावा

## जी. आर. पळसे : न्यू कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण

**» जुनं कोल्हापूर**

**फुलेवाडी, ता. २१ :** ''योग्य मार्गदर्शन, प्रेरणा, योग्य संधी साधून विद्यार्थ्यांनी आपला सर्वांगीण विकास साधावा,'' असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी केले.

न्यू कॉलेजतर्फे वार्षिक पारितोषिक वितरण झाले. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन आर. डी. पाटील (वडगांवकर) अध्यक्षस्थानी होते. श्री. पळसे म्हणाले, ''प्रत्येक महाविद्यालयाच्या वर्गातील विद्यार्थी देशाचे भवितव्य समजले जातात. विद्यार्थ्यांचे मन, मेंदू, मनगट यांचा विकास करते ते शिक्षण. तेंव्हा विद्यार्थ्यांनी आपल्यातील सुप्तगुण ओळखून करियर निश्चिती करावी. सर्वांगसुंदर जीवन जगायचे असेल तर, आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सर्व क्षेत्रांबाबत सजग असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी 'हार्डवर्क' न करता 'स्मार्टवर्क'कडे अधिक लक्ष दिले पाहिजे.''




**शिवाजी पेठ : वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी बोलताना जी. आर. पळसे.**

श्री. पाटील-वडगावकर म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी कष्ट हेच भांडवल समजून कर्तृत्त्वाची शिखरे पादाक्रांत केली पाहिजेत. संस्कार' हा शिक्षणाचा प्राण आहे. संस्काराच्या शिदोरीवरती विद्यार्थ्यांची जीवन वाटचाल सुखकर होते.''

प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत केले. क्रीडा विभाग प्रमुख प्रा. ए. डी. सासने यांनी अहवाल वाचन केले. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान केला. संस्थेचे उपाध्यक्ष डी. जी. किल्लेदार, संचालक ए. जी. वणिरे, वाय. एस. चव्हाण, वाय. एल. खाडे, सौ. सविता पाटील, पी. सी. पाटील, उदय पाटील, पर्यवेक्षक, एस. एन. इनामदार, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य टी. के. सरगर यांनी आभार मानले. डॉ. एस. एच. शेटके, प्रा. यू. के. गायकवाड, प्रा. यू. आर. बिरंजे यांनी सूत्रसंचालन केले.